PUDHARI, Mumbai, 23.10.2020
Page No. 2, Size:(7.66)cms X (7.57)cms.

# बुलेट ट्रेनच्या सर्वाधिक मार्गाचे बांधकाम एल. अँड टी.कडे

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या कामाने वेग घेतला आहे. गुजरात राज्यातील बुलेट ट्रेनचे काम करण्याचे कंत्राट एलॲण्डटी कंपनीला मिळाले आहे. गुजरातमधील बुलेट ट्रेनचे २३७ किलोमीटरचे बांधकाम एलॲण्डटी करणार आहे.यात वापी,बिलिमोरा,सुरत,भरुच या चार स्थानकांचा समावेश आहे.

टाळेबंदीमध्ये हळुहळु शिथिलता दिल्यानंतर नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एनएचएसआरसीएल) आपल्या सर्व कामांना पुन्हा सुरुवात केली आहे. गुजरात राज्यात या प्रकल्पासाठीची ८५ टक्यांहून अधिक जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. पॅकेज सी ४ अंतर्गत २३७ किलोमीटरचे बांधकाम करण्यासाठी लार्सन अँड टुब्रोने सर्वात कमी २४ हजार ९८५ कोटी रुपयांची बोली लावली. या कामासाठी तीन कंपन्यांनी आर्थिक निविदा सादर केली होती. बुलेट ट्रेनच्या कामात पॅकेज सी ४ हे सर्वात मोठे आहे. कारण यामध्ये बुलेट ट्रेनचे ४६.६६ टक्के काम येते.या कामासाठी १ मार्च रोजी एनएचएसआरसीएल निविदा मागविल्या होत्या. २ सप्टेंबर रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या.त्यामध्ये तीन कंपन्यांनी भाग घेतला होता.



## ५०८ किमीचा रेल्वे मार्ग

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा ५०८ किमीचा प्रकल्प आहे. हा मार्ग बांधण्यासाठी लागणाऱ्यां खर्चापैकी ८० टक्के भारताने जपानकडून ०.१ टक्के व्याजावर कर्जाऊ घेतली आहे.ही रक्कम १५वर्षात फेडावयाची आहे. २०२२ साली ७५व्या स्वातंत्र्यदिनी या बुलेट ट्रेनच्या मार्गावरील एक भागाचे तरी उदघाटन करण्याचे लक्ष्य केंद्र सरकारचे आहे.